॥ ... ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON.

(NAAC ACCREDITED ★ ★ ★ ★)

P. B. NO. : 80, UMAVI NAGAR, JALGAON - 425 001 (M.S.)

1990 ★★★★ NAAC ACCREDITED

EPABX : (0257) 2252187-90
Fax NO. : 0257 - 2252183
Gram : "UTTAMVIDYA"
Web Site : www.nmu.ac.in
E-mail : nmunijal_jal@sancharn

उमवि/५-ए/ ४५४९ /२००४ दिनांक: १५/९/२००४

प्रति,
मा. अध्यक्ष,
जामिया ईस्लामिया इशाअतुल उलूम,
अक्कलकुवा, जि.नंदुरबार.

विषय:- शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून अक्कलकुवा, जि.नंदुरबार येथे शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे बी.एड. (जनरल) (इंग्रजी व मराठी माध्यम) नवीन महाविद्यालय सुरू करणेस परवानगी देणेबाबत ....

संदर्भ:- १) एन.सी.टी.ई.भोपाळ यांचे पत्र क्र. डब्ल्यूआरसी/२-३२/६२/१२३१८३/२००४/४९६७, दि. ३ ऑगस्ट, २००४.
२) मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२, यांचे पत्र क्र. एनजीसी २००३/(३०१/०३) मशि-३, दि. ९ ऑक्टोबर, २००३.
३) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांचे पत्र क्र. अमवि २००४/(२७१/०४)/मशि-३ ,दि. ६ ऑगस्ट, २००४
४) मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२, यांचे पत्र क्र. एनजीसी २००४/(३१७/०४) मशि-३, दि. १३ ऑगस्ट, २००४.
५) विद्यापीठ पत्र क्र.उमवि/५-ए/४१०२/२००४, दि.२६/८/२००४.

महोदय,

महाराष्ट्र शासनाने वरील संदर्भिय पत्र क्र. ४ वरील पत्रात नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून आपल्या संस्थेस अक्कलकुवा, जि.नंदुरबार येथे शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरू करण्यास शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून नवीन महाविद्यालयाच्या संदर्भात तपासणी करून अहवाल विद्यापीठास सादर करण्यासाठी, संदर्भ क्र. ५ वरील पत्रान्वयें स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यांत आली होती. सदरहू समितीने सादर केलेल्या अहवालास मा. कुलगुरू महोदयांनी विद्या परिषदेच्या वतीने मान्यता प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने मला प्राप्त झालेल्या आदेशावरून आपणांस कळविण्यांत येते की, सोबत जोडलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेल्या अटींची/त्रुटींची पूर्तता, सदर पत्र प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत पूर्ण करण्याच्या शर्तीवर आपल्या संस्थेस अक्कलकुवा, जि.नंदुरबार येथे शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे बी. एड. (जनरल) (इंग्रजी व मराठी माध्यम) (अध्यापन पद्धतीचे विषय-"मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दु, गणित, शास्त्र, इतिहास, भूगोल") १०० विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह नवीन महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून सुरू करण्यास महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ च्या कलम ८३(४) नुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता एक वर्षाकरिता राहील व सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आवश्यक राहील याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

शासनाच्या संदर्भिय पत्र क्र.४ वरील पत्रात नमूद केलेल्या बाबींची तसेच एन.सी.टी.ई. विभागीय कार्यालय, भोपाळ, शासनाच्या व विद्यापीठाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या नियमांचे/ आदेशाचे पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

...२